-: प्रेस नोट :- दिनांक १८/०९/२०२३

# ऑनलाईन रेटींग टास्क फ्रॉड या सायबर गुन्हयातील टोळीस अटक केल्याबाबत.

| | | |
|---|---|---|
| १ | कक्ष | गु.प्र.शा., गु.अ.वि., कुर्ला (प.), मुंबई ७०. |
| २ | गु.नो.क्र. व कलम | धारावी पोलीस ठाणे गु.र.क्र. ६६१/२०२३, कलम ४२०, ३४ भा.द.वि. सह माहीती तंत्रज्ञान अधिनीयम सन २००० चे कलम ६६ड प्रमाणे |
| ३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ | दि. २९/०८/२०२३ ते ३१/०८/२०२३ दरम्यान फिर्यादीचे मोबाईल फोनवर |
| ४ | गुन्हा दाखल दिनांक | दि.०१/०९/२०२३ रोजी ०७.२६ वाजता. |
| ५ | आरोपीचे नाव व पत्ता | १) पुरूष वय २२ वर्षे, रा. लोणी, अहमदनगर<br>२) पुरूष वय २२ वर्षे, रा. राहता, अहमदनगर<br>३) पुरूष वय ३१ वर्षे, रा. हरियाणा<br>४) पुरूष वय ३४ वर्षे, रा. खराडी, पुणे |
| ६ | जप्त मालमत्ता | १) ०९,२७,०००/- रू बॅंक खात्यात फ्रिज, २) ०३,५०,०००/- रू रोख रक्कम व ३) ०८ मोबाईल फोन. |
| ७ | थोडक्यात प्रेस नोट | खालील प्रमाणे |

यातील फिर्यादी यांना अनोळखी मोबाईल क्रमांकावरून व्हॉटसअपवर संपर्क साधुन टेक्नो ०५ मिडीया इंडस्ट्रीज मध्ये त्या काम करीत असून पैश्यांच्या बदल्यात गुगल मॅपवर हॉटेलला रेटींग दयावयाचे पार्ट टाईम जॉब असल्याचे सांगीतले. सुरूवातीचे दोन दिवस फिर्यादीस रेटींगचे टास्क देवून त्याबदल्यात फिर्यादीचे बॅंक खात्यात पैसे जमा करून त्यांचा विश्वास संपादन करण्यात आला. तिस-या दिवशी आरोपीतांनी फिर्यादीस ३०/०८ गुगल मॅपस या टेलीग्राम ग्रुपवर ॲड करून तीला पैसे गुंतविण्यास सांगुन त्या बदल्यात २६ लाखापर्यंत तात्काळ परतावा मिळण्याचे आमीष दाखविले. त्यानंतर आरोपीत यांनी टेलीग्राम ग्रुपवर दिलेल्या बॅंक अकाउंटमध्ये फिर्यादीने थोडे थोडे करून एकुण ०९,६८,०००/- रु ट्रान्सफर करून गुंतविले. त्यानंतर फिर्यादीने सदरचे पैसे त्यावरील रिटर्नसह परत मागीतले असता आरोपीत यांनी फिर्यादीस टेलीग्राम ग्रुपमधुन रिमुव्ह केले तसेच व्हॉटसअपवर ब्लॉक करून फिर्यादीची फसवणुक केल्याबाबत गुन्हा दाखल झाला आहे..

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, कक्ष ५ यांचेकडुन चालु करण्यात आला. गुन्हयाचे तपासात आरोपीत यांनी वापरलेले बॅंक खात्याचे स्टेटमेंटचे विश्लेषण करण्यात आले तसेच आरोपीतांनी गुन्हयाकरीता वापरलेले मोबाईल क्रमांकाचे तांत्रीक विश्लेषण करण्यात आले. विश्लेषणानंतर आरोपीत यांनी लोणावळा येथील हॉटलेमध्ये राहुन सदरचा गुन्हा केला असल्याचे दिसून आल्याने सदर हॉटेलचा शोध घेवून आरोपीत यांना निष्पन्न करण्यात आले. गुन्हयाकरीता बॅंक अकाउंट कमीशनवर पुरविणारे दोन आरोपीत यांना लोणी, अहमदनगर येथुन अटक करण्यात आले आहे. तसेच तांत्रीक बाबी सांभाळणारे दोन आरोपीत यांना खराडी, पुणे येथुन अटक करण्यात आले आहे. यातील आरोपीत क्रमांक ०३ हा हरियाणा येथुील फसवणुकीच्या गुन्हयातील आरोपीत असून तो तेथुन पळुन पुणे येथे लपुन राहीला होता. अटक आरोपीतांकडुन ०८ मोबाईल फोन व ०३,५०,०००/- रू रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. बॅंक खात्यात ०९,२७,०००/- रू रक्कम फ्रिज करण्यात आली आहे. आरोपीत यांनी अश्या प्रकारे ब-याच जणांची टेलीग्राम ॲप ग्रुपद्वारे फसवणुक केली असल्याचे दिसून आले आहे.

अश्या प्रकारे टेलीग्राम, फेसबुक किंवा व्हॉटसअप ग्रुपवर पैश्यांचे बदल्यात ऑनलाईन टास्क देणारे किंवा गुंतवणुकीवर तात्काळ जास्तीचा परतावा देणा-या आमीषांना नागरीकांनी बळी न पडता तात्काळ अश्या

प्रकारच्या टेलीग्राम ग्रुप / मोबाईल क्रमांक / बॅंक खात्यांची माहीती तात्काळ पोलीसांना दयावी असे आवाहन मुंबई पोलीसांतर्फे करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई, श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशीकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. अमोघ गावकर, मा. सहा. पो. आयुक्त (मध्य), श्री. दत्तात्रय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ५ चे प्र.पो.नि. घनश्याम नायर, पो.नि. अजित गोंधळी, सपोनि अमोल माळी, पो.ह.अविनाश चिलप, पोशि प्रमोद पाटील, पोशि भाउसो पवार व चालक पो.शि. हरेश कांबळे यांनी केली आहे.